# वास्तुदर्शन

(पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघाचे मुखपत्र)

**Registered PRGI NO - MAHMAR | 2015 | 63869**

वर्ष-१३ * जून २०२६ * अंक - १२ * पृष्ठ संख्या - २०



गेरा एम्पोरियम आणि पुणे जिल्हा महासंघ यांच्यावतीने आयोजित सहकार दरबार, नाशिक फाटा उद्घाटनासाठी उपस्थित महासंघाचे व गेरा एम्पोरियमचे पदाधिकारी आणि संचालक.
दि. १ मे २०२६



नाशिक फाटा सहकार दरबार उद्घाटनासाठी उपस्थित सहकारी गृहनिर्माण संस्थांचे प्रतिनिधी

SIILC
Transforming Human Capital

महाराष्ट्र राज्य सह. गृहनिर्माण संस्था व अपार्टमेंट्स महासंघ मर्या.
आणि SIILC (SIMACES Learning LLP) सकाळ यांच्या संयुक्त विद्यमाने

## सहकारी गृह. संस्थांच्या व्यवस्थापकासाठी (मॅनेजर) प्रशिक्षणाचे आयोजन

सहकारी गृह. संस्थांचे उपविधी, रजिस्टर्स, सर्वसाधारण सभा, लेखापरिक्षण, थकबाकी वसुली, नॉमिनेशन, सुरक्षा, पर्यावरण पूरक संस्था इ. विषयांवर प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण.

**प्रशिक्षण दिनांक : १९, २० व २१ जुन २०२६**
**वेळ : सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत**

* प्रशिक्षण शुल्क *
**प्रत्येकी रू. १०,०००/- (प्रति व्यक्ती)**
चहा, भोजन, अभ्यासटीपण, प्रमाणपत्रासह

**Payment : ACCOUNT Details**
**Name:** Pune Dist. Co-Op. Hsg. Soc. And Apt. Fed. Ltd
**Account No.:** 045209100000063
**Bank:** Sarswat Bank **Branch:** Narayan Peth, Pune
**IFSC:** SRCB0000045

सध्याचे व्यवस्थापन समिती सदस्य, व्यवस्थापक होऊ इच्छिणाऱ्या व्यक्ती तसेच संस्थेतील सदस्य या प्रशिक्षणाचा लाभ घेऊ शकतात. तरी त्वरित नाव नोंदणी करावी.

* पूर्वनावनोंदणी १७ जुन पर्यंत करावी. *

संपर्क: 9689898360, 9112191611

* स्थळ : SIILC मीडिया सेंटर, बाणेर रोड, औंध, पुणे *

# वास्तुदर्शन

(पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघाचे मुखपत्र)

संपादक : **सुहास पटवर्धन,** अध्यक्ष

पत्ता : ३१३ नारायण पेठ, प्रभात प्रेससमोर, पुणे – ४११०३०.

संपादन सहाय्य : **संचालक मंडळ**

**दूरभाष** : **०२०–२४४५४०१०**

**ई–मेल** : **punefed@gmail.com**

**वेबसाईट** : **www.punefed.com**

**यूट्यूब चॅनल** : **Pune District Housing Federation**

**इन्स्टाग्राम** : **instagram.com / maharashtrahousingfederation**



© : 'वास्तुदर्शन' हे मासिक पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ मर्यादित यांचे स्वाधीन



प्रकाशक : **श्री. सुहास केशव पटवर्धन**

मुद्रक : **श्री सिद्धिविनायक एंटरप्राइजेस,** ए–६ विजयश्री टॉवर्स, दत्तवाडी, पुणे ४११ ०३०. भ्रमणध्वनी : ९८९००७३९४७


## अनुक्रमणिका


| क्र. | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | महासंघाची अधिकृत विक्री केंद्रे | ४ |
| २. | संपादकीय | ५ |
| ३. | पर्यावरण | ६ |
| ४. | भोसरीतील गेरा एम्पोरियममध्ये 'सहकार दरबार'चे उद्घाटन; | ८ |
| ५. | साध्या कागदावर प्रतिज्ञापत्र करण्याचा शासनाचा आदेश | १० |
| ६. | बायो टॉयलेट : पर्यावरणपूरक आणि शाश्वत स्वच्छतेचा मार्ग | ११ |
| ७. | संस्थेच्या हिशोबपत्रकांबाबत माहिती | १४ |
| ८. | सहयोगी सदस्य | १५ |
| ९. | मे महिना – महासंघाचे सभासदत्व | १७ |
| १०. | नियमित पान | १८ |



'वास्तुदर्शन' हे मासिक पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ मर्यादित यांचे मालकीचे असून त्यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक श्री. सुहास केशव पटवर्धन यांनी श्री सिद्धिविनायक एंटरप्राइजेस, ए–६ विजयश्री टॉवर्स, दत्तवाडी, पुणे ४११ ०३०. येथे छापून ३१३ नारायण पेठ, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक – **सुहास केशव पटवर्धन,** मुद्रण स्थान : **श्री सिद्धीविनायक एंटरप्राइजेस – ९८९००७३९४७**


*कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होता येते.*

**महासंघातर्फे सहकारी संस्थांना नेहमी लागणारे फॉर्म्स, उपविधी, रजिस्टर्स, संस्था नोंदणीचे फॉर्मस्
पावती पुस्तके, व्हाऊचर्स यांची योग्य दरात विक्री महासंघाच्या मुख्य कार्यालयातून
सकाळी १०.३० ते सायं. ५.३० या वेळेत करण्यात येते.**

१) भाडेकरू सहभागीदारी संस्था पोटनियम– (फ्लॅट टाईप) इंग्रजी व मराठी
२) संस्था नोंदणी फॉर्मस् संच
३) पोटनियम दुरुस्ती फॉर्मस् संच
४) सभासद फॉर्म (इंग्रजी व मराठी)
५) सहसभासद फॉर्म
६) ट्रान्सफर फॉर्म संच
७) फॉर्म 'ओ' (लेखापरीक्षण दुरुस्ती)
८) फॉर्म 'ओ' पुरवणी
९) नॉमिनेशन फॉर्म (इंग्रजी व मराठी)
१०) रोजकीर्द
११) सभासद रजिस्टर नमुना 'आय'
१२) J रजिस्टर
१३) शेअर रजिस्टर
१४) प्रोसिडिंग बुक
१५) पावती पुस्तके
१६) व्हाऊचर पुस्तके
१७) व्यवस्थापन मार्गदर्शिका
१८) वसुली पुस्तिका
१९) निवडणूक पुस्तक
२०) नॉमिनेशन रजिस्टर
२१) मॉर्गेज रजिस्टर

## महासंघाची अधिकृत विक्री केंद्रे

- **१. स्कुलशॉपी –** दुकान क्र. ९, कॉर्पोरेशन बिल्डिंग, चैतन्य हॉस्पिटलसमोर, चापेकर चौक, चिंचवड, पुणे – ४११०३३. भ्रमणभाष : ९३२६०५४९०६
- **२. श्री स्टेशनर्स –** रेव्हेन्यू कॉलनी, तळेगाव दाभाडे, पुणे भ्रमणभाष : ९२७३५०५६०४
- **३. निशा कन्सल्टन्सी –** कृतिका अपार्टमेंट, ग्रीन फुड रेस्टॉरंट जवळ, कोथरुड, पुणे ४११०३८. भ्रमणभाष : ९८५०८८८९७९
- **४. सोसायटी प्लस –** बाजीराव रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे–४११०३०. भ्रमणभाष : ९३७००८८९९५
- **५. प्राईड साईन –** वडगाव धायरी, पुणे – ४११०४१. भ्रमणभाष : ९११२१९१६११
- **६. सुकन्या निरगुडे –** एच–४२, एकता सोसायटी, शिवतीर्थनगर, कोथरुड, पुणे – ४११०३८. (शाखा : सासवड, कोडीत) भ्रमणभाष : ९१५६४१४१९१
- **७. मे. एस. जे. खामकर ॲण्ड असोसिएटस् –** मुंढवा घोरपडी रोड, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मागे, मुंढवा, पुणे – ४११०३६. भ्रमणभाष : ९६२५३४३४३४
- **८. स्वाती पवार – समर्थ सर्व्हिसेस –** स.नं. ४३/२, शिवांजली लेन नं. ३, दत्तनगर, आंबेगाव, पुणे – ४११०४६. भ्रमणभाष : ९४०३९७८९४३.
- **९. पी.एल. इंदोरे ॲण्ड असोसिएटस् –** कमलराज दत्तविहार सोसायटी, मोशी, चिखली रोड, मोशी, पुणे – ४१२१०५. भ्रमणभाष : ९७३०७६७५७९
- **१०. द स्टेशनरी आयकॉन –** शॉप नं. ६, तुषार कॉम्प्लेक्स, पेट्रोलपंप समोर, पौड रोड, भुगाव, पुणे – ४१२११५.
- **११. कुमार सबलाईम सोसायटी –** पारगे नगर, कोंढवा खुर्द, कोंढवा पोलिस स्टेशनमागे, पुणे – ४११०४८. दूरभाष : ०२०–४८६०७७१७
- **१२. सोसायटी स्मार्ट –** इस्टर्न विंग, जय गणेश विश्व, विश्रांतवाडी चौक, पुणे – ४११०१५. भ्रमणभाष : ९९६०८२९९९८
- **१३. शितल जाधव –** हिंजवडी पुणे को. ऑप. हाऊसिंग अलायन्स भ्रमणभाष : ८४८२८७३४४५
- **१४. चैतन्य पुरंदरे –** विश्वगंगा कॉम्प्लेक्स, संतोष हॉलजवळ, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे – ४११०५१. भ्रमणभाष : ९८६०८२०३९०

## पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ मर्यादित

punefed@gmail.com

♦ *संचालक मंडळ* ♦

| | |
|---|---|
| मा. सुहास पटवर्धन, अध्यक्ष | ९४२२००४७०१ |
| मा. सुभाष कर्णिक, उपाध्यक्ष | ९७६६६०६१४६ |
| सौ. मनीषा कोष्टी, सचिव | ९९२२४१९२१६ |
| मा. चारूहास कुलकर्णी, कोषाध्यक्ष | ९५५२५४६६०७ |
| मा. अनिल असगेकर | ९९६०६०८०७३ |
| मा. सुभाष ढवळे | ९४२१०५८२५५ |
| ॲड. मृद्‌गंधा जोशी | ८७६६४३२७६९ |
| मा. जुजर हैदरी | ९३७१०१७४४० |
| मा. शिवाजी उराडे | ९४२३०१५९९६ |
| मा. अजित चौगुले | ७७५७०२१९५३ |
| मा. विलास थोरात | ९८९००५४३५१ |
| ॲड. प्रकाश तोंडारे | ९७६३६०३३८४ |
| मा. समीर रुपदे | ९८५०५६७४७५ |
| मा. मनोहर देशपांडे | ९३७१०७३७२७ |
| मा. राजन प्रसादे | ९६०४२१२४३० |
| मा. संभाजी घुंडरे | ९८८१०७७२९६ |
| मा. संजय सूर्यवंशी | ९६२३९२९८८९ |
| मा. अव्हेलिनो नरोना | ९९७०४७३१८९ |

♦ *तज्ञ संचालक* ♦

ॲड. वसंतराव कर्जतकर

आर्किटेक्ट विश्वास कुलकर्णी

♦ *कार्यकारी संचालक* ♦

| | |
|---|---|
| कर्नल प्रमोद दहीतुले | ९९९९५३७४३२ |

## संपादकीय

**जू**न महिना म्हणजे पावसाळ्याची सुरुवात, पण गेली काही वर्ष आपल्या लक्षात आले असेल की एकतर मे अखेर अवकाळी पाऊस पडतो नंतर जून महिना कोरडा आणि जुलै मध्ये अतिवृष्टी. यामुळे शेतकऱ्यांचे तर नुकसान होतेच, त्याचबरोबर शहरी भागात धरणातील पाणीसाठ्याला तळ लागलेला असतो. आताही पुण्यामध्ये एकदिवसाआड पाणी पुरवठा होत आहे. किती नागरिक पाणी काटकसरीने पाणी वापरतात हे स्वतःला विचारावे. पाण्याची अनावश्यक साठवणूक करून आपण पाणीपुरवठ्यावर पुन्हा ताणच आणतो, पण त्याऐवजी जर वर्षभरच काळजीपूर्वक पाणी वापरले तर मे अखेर पाण्याचा असा तुटवडा पडणार नाही. छोट्या छोट्या उपाययोजना खूप पाणी वाचवू शकतात. फक्त ते करण्याची मानसिक तयारी हवी आणि कुटुंबातील कार्यालयातील सर्वांनी त्यात सहभागी व्हायला हवे. काही छोटे उपाय इथे देत आहे. आपण स्वतः, आपले कुटुंबीय व आजूबाजूचे नागरीक, स्नेही मंडळींना आवर्जून सांगा.

❊ तोंड धुताना, दात घासताना, भांडी धुताना नळ पूर्ण वेळ सुरू ठेऊ नये.

❊ स्वयंपाकातील भाज्या, डाळ, तांदूळ धुतलेले पाणी झाडांना घालावे.

❊ वाहने पाणी मारून धुण्याऐवजी ओल्या कापडाने पुसून घ्यावीत.

❊ घरातील फरशा एक दिवसाआड पुसाव्यात.

❊ पिण्यासाठी जेवढे लागते तेवढेच पाणी घ्यावे. फेकून देऊ नये.

❊ कपडे धुण्याचे मशीन पुरेसे कपडे असतील तेव्हाच लावा.

अशा प्रकारे पदाधिकाऱ्यांनी आपापल्या संस्थेत आवाहन केल्यास पाण्याची बचत होऊन पुढील नियोजन सुरळीत होईल. पर्यावरण संवर्धनासाठी एक पाऊल उचलूया.

**– मनीषा विजय कोष्टी**
**सचिव**

❊❊❊

## वास्तुदर्शन मासिक जाहिरात दरपत्रक ❊ GST सह

| | ब्लॅक ॲण्ड व्हाईट | फोर कलर |
|---|---|---|
| १/३ पान | २,३६०/- | - |
| अर्धे पान | ३,५४०/- | - |
| पूर्ण पान | ४,७२०/- | १७,७००/- |
| पूर्ण दोन पाने | - | २३,६००/- |

❊ हे दर प्रत्येक महिन्यासाठी लागू राहतील.

❊ १२ महिन्यांसाठी जाहिरात दिल्यास वरील दरात एक महिन्याची सूट मिळेल.

# पर्यावरण

**जा**गतिक पर्यावरण दिन ५ जूनच्या निमित्ताने आपण पर्यावरण या विषयाची माहिती घेऊया.

सर्वप्रथम आपण बघूया, पर्यावरण म्हणजे काय?

पर्यावरण म्हणजे सभोवतालची आपल्या आजूबाजूची परिस्थिती. आपल्या आजूबाजूला असणारे सजीव, निर्जीव घटक, नैसर्गिक स्रोत आणि मानवनिर्मित गोष्टी यांच्यातील आंतरक्रियेला 'पर्यावरण' म्हणतात. हे पर्यावरण सृष्टीचे आणि पर्यायाने मानवी जीवनाचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

**पर्यावरणाची संकल्पना**

'पर्यावरण' Environment हा शब्द फ्रेंच भाषेतील 'Environia' या शब्दापासून आला आहे, ज्याचा अर्थ 'सभोवताल' असा होतो. मानवाच्या जन्मापासूनच त्याचा पर्यावरणाशी जवळचा संबंध राहिला आहे. पर्यावरणामुळेच आपल्याला श्वास घेण्यासाठी हवा, पिण्यासाठी पाणी आणि अन्न मिळते.

पर्यावरणाचे प्रामुख्याने दोन भाग पडतात: जैविक घटक आणि अजैविक घटक : सजीव आणि निर्जीव घटक. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जैविक आणि अजैविक घटक एकमेकांवर अवलंबून असतात. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे :

**१. जैविक घटक (Biotic Factors):** पर्यावरणातील सर्व सजीवांचा जसे की मानव, प्राणी, वनस्पती आणि सूक्ष्मजीव यांचा समावेश जैविक घटकांमध्ये होतो. यामध्ये प्रामुख्याने पुढील तीन प्रकार येतात.

- **उत्पादक (Producers) :** यामध्ये सर्व हिरव्या वनस्पतींचा समावेश होतो. त्या सूर्यप्रकाशाच्या मदतीने स्वतःचे अन्न स्वतः तयार करतात.
- **ग्राहक (Consumers) :** जे सजीव स्वतःचे अन्न तयार करू शकत नाहीत आणि अन्नासाठी उत्पादकांवर (वनस्पतींवर) किंवा इतर प्राण्यांवर अवलंबून असतात. यात मानव, शाकाहारी आणि मांसाहारी प्राणी येतात.
- **विघटन करणारे (Decomposers) :** यामध्ये सूक्ष्मजीव आणि बुरशी (Fungi) यांचा समावेश होतो. हे मृत वनस्पती व प्राण्यांचे विघटन करून त्यातील पोषक घटक पुन्हा जमिनीत मिसळतात.

**२. अजैविक घटक (Abiotic Factors) :** यामध्ये सर्व निर्जीव गोष्टी, जसे की हवा, पाणी, जमीन, सूर्यप्रकाश आणि तापमान यांचा समावेश होतो.

- **हवा आणि वातावरण (Air) :** ऑक्सिजन, नायट्रोजन आणि कार्बन डायऑक्साईड सारखे वायू सजीवांच्या श्वसनासाठी आणि वनस्पतींच्या प्रकाशसंश्लेषणासाठी अत्यंत आवश्यक असतात.
- **पाणी (Water) :** सर्व सजीवांच्या मूलभूत जैविक प्रक्रिया आणि अस्तित्वासाठी पाणी आवश्यक आहे.
- **सूर्यप्रकाश (Sunlight) :** पृथ्वीवरील ऊर्जेचा मुख्य स्रोत. वनस्पती सूर्यप्रकाशाच्या मदतीने अन्न तयार करतात.
- **तापमान (Temperature) :** हवामानातील बदल आणि सजीवांची वाढ यावर तापमानाचा थेट प्रभाव पडतो.
- **माती आणि खनिजे (Soil and Minerals) :** वनस्पतींच्या वाढीसाठी माती पोषक घटक पुरवते.

**पर्यावरणाचे महत्त्व आणि संतुलन**

जैविक आणि अजैविक घटकांच्या मिलाफातून आपली संपूर्ण परिसंस्थेची साखळी (Ecosystem) तयार होते. हे सर्व घटक एकमेकांवर अवलंबून असतात. जेव्हा हे संतुलन बिघडते, तेव्हा नैसर्गिक आपत्ती (उदा. हवामान बदल, प्रदूषण) निर्माण होतात. म्हणूनच 'पर्यावरण सुरक्षित तर मानव सुरक्षित' हा मंत्र मानला जातो.

आजच्या काळात पर्यावरणाचे रक्षण करणे ही मानवाची सर्वात मोठी गरज बनली आहे. शाश्वत विकासासाठी (Sustainable Development) सर्वांनी मिळून निसर्गाचे जतन करणे आणि प्रदूषण रोखणे काळाची गरज आहे.

**सर्वसामान्यांसाठी पर्यावरण आणि आपली वैयक्तिक जबाबदारी :**

मानवी जीवनाचा पाया पर्यावरणावरच अवलंबून आहे. आज वाढत्या प्रदूषणामुळे आणि मानवाच्या हव्यासामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. त्यामुळे प्रत्येकाने दैनंदिन सवयींमध्ये बदल करून पर्यावरण संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे.

**आपली वैयक्तिक जबाबदारी काय आहे?**

पर्यावरण वाचवणे ही केवळ सरकारची किंवा मोठ्या संस्थांची जबाबदारी नाही. प्रत्येकाने आपापल्या पातळीवर खालील गोष्टी करणे आवश्यक आहे :

- **पाण्याचा अपव्यय टाळणे :** 'पाणी हेच जीवन आहे.' पिण्याचे पाणी असो किंवा घरगुती वापर, पाण्याचा जपून वापर करणे आवश्यक आहे. वाया जाणारे पाणी वाचवावे. तसेच भूगर्भ जल पातळी वाढवण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंगचा वापर करावा. सांडपाण्याचा वापर बागेसाठी करावा.
- **प्लास्टिकचा वापर टाळणे :** प्लॅस्टिक हे पर्यावरणाचा सर्वात मोठा शत्रू आहे. बाजारात जाताना नेहमी कापडी पिशवीचा वापर करा आणि एक-वेळ (Single-use) वापरल्या जाणाऱ्या

प्लॅस्टिकचा पूर्णपणे त्याग करा.

- ✻ **कचरा व्यवस्थापन :** घरचा ओला व सुका कचरा वेगळा करा. ओल्या कचऱ्यापासून खत तयार करून ते झाडांसाठी वापरता येऊ शकते. उघड्यावर कचरा जाळणे टाळावे.
- ✻ **वृक्षारोपण आणि संवर्धन :** केवळ झाडे लावणे पुरेसे नाही, तर त्यांची निगा राखणे ही आपली जबाबदारी आहे. 'एक मूल, एक झाड' या तत्त्वावर प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन केले पाहिजे.
- ✻ **ऊर्जेची बचत :** वीज निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक संसाधनांचा वापर होतो. विनाकारण सुरू असलेले दिवे आणि पंखे बंद करा. शक्य असल्यास सौर ऊर्जेचा (Solar Energy) वापर वाढवा.
- ✻ **प्रदूषणाला आळा घालणे :** शक्य असल्यास सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा (उदा. बस, रेल्वे) वापर करा. वाहनांची नियमित तपासणी करून धूर नियंत्रण राखा.
- ✻ **नैसर्गिक संसाधनांचा अपव्यय टाळणे**:निसर्गाने दिलेल्या मौल्यवान देणग्यांचा-जसे की जमीन, जंगले आणि खनिजे- आवश्यकतेनुसार वापर करा अन्यथा टाळा.

निसर्गाने आपल्याला पृथ्वीरूपी सुंदर घर दिले आहे. आपल्या पुढच्या पिढीला शुद्ध हवा, पाणी आणि निरोगी निसर्ग मिळावा यासाठी पर्यावरण संवर्धन करणे हीच आपली खरी वैयक्तिक जबाबदारी व देशसेवा आहे.

**थोडक्यात सांगायचे तर :**

**निसर्गाने मानवाला जगण्यासाठी सर्व काही दिले आहे. जर आपण पर्यावरणाचे रक्षण केले, तरच आपले आणि आपल्या पुढच्या पिढीचे आरोग्य सुरक्षित राहील. पर्यावरण संरक्षणाचा हा संकल्प आपण स्वतःपासून आणि आपल्या घरापासूनच सुरू केला पाहिजे.**

**अटल वास्तू.भारत** आणि **KSKM24 Multitrade Services Pvt. Ltd.** यांच्या संयुक्त विद्यमाने...

**तेजस्विनी माळी,** (Environmental Consultant) आणि **सचिन माने,** (Water Renewable Energy Expert)

**atalvastugmail.com, skm24mspvtltdgmail.com**

पुढील भागात आपण पाहू,

पर्यावरण बदल आणि त्याची कारणे.

**- तेजस्विनी माळी**

✻✻✻

# महाराष्ट्र राज्य युवा बहुउद्देशीय सहकारी संस्थेची पहिली सर्वसाधारण सभा आणि सह. गृह संस्थांसाठी मार्गदर्शन सत्राचे आयोजन

**रा**ष्ट्रीय सहकार धोरण २०२५ नुसार सहकार क्षेत्रात युवा आणि महिलांचा सहभाग वाढावा यासाठी युवा बहुउद्देशीय संस्था स्थापन करण्याची सूचना राष्ट्रीय सहकार धोरण समितीत मांडण्यात आली. त्यानुसार समितीतील महाराष्ट्र राज्य सह. गृह संस्था आणि अपार्टमेंट महासंघाचे अध्यक्ष **श्री. सुहास पटवर्धन** यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र राज्य युवा बहुउद्देशीय सहकारी संस्थेची पायाभरणी केली गेली. १८ ते ३५ वयोगटातील महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील विद्यार्थी तसेच व्यावसायिक, नोकरदार युवक, युवती या संस्थेचे सभासद होणार असून युवकांना नोकरी, व्यवसायात मार्गदर्शन, आर्थिक साहाय्य इ. विषयांसाठी ही संस्था करून युवकांना सक्षम बनवेल.

या संस्थेच्या प्रवर्तक सदस्यांची पहिली सर्वसाधारण सभा शनिवार दि. ३० मे २०२६ या दिवशी सकाळी १०.३० वाजता अश्वमेध सभागृह, कर्वे रस्ता येथे पार पडली. या सभेत मा. **सुहास पटवर्धन** यांनी संस्थेचा उद्देश सांगून युवकांना सहभागी होण्याचे आवाहन केले.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील संस्थेचे प्रोफेसर **श्री. धनंजय मुंडे** यांनी सहकारी संस्थांमार्फत सर्व प्रकारच्या सेवा मिळाल्यानंतर समाजाला खूप लाभदायक ठरेल. तसेच सर्व युवकांना शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र राज्य सह. गृह महासंघाचे तज्ज्ञ संचालक **अॅड. श्रीप्रसाद परब** यांनी सहकार कायद्याची माहिती देऊन युवकांनी सहकारात येऊन देशाच्या हितासाठी कार्य करावे असे आवाहन केले.

त्यानंतर सह. गृह संस्थांसाठीच्या मार्गदर्शन सत्रात **श्री. किशोर तोष्णीवाल** यांनी सह. गृह संस्थांच्या हिशोबपत्रके, नोटीसेस, पत्रव्यवहार यासाठीच्या अॅपची माहिती दिली.

**श्रीमती तेजस्विनी माळी** यांनी पर्यावरण या विषयाबरोबर घनकचरा व्यवस्थापन या विषयावर माहिती दिली.

पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघाचे संचालक **श्री. समीर रुपदे** यांनी शासकीय मतदार यादीमध्ये आपले नाव समाविष्ट कसे करायचे याची माहिती दिली.

महाराष्ट्र राज्य युवा बहुउद्देशीय सहकारी संस्थेचे मुख्य प्रवर्तक **श्री. भीम बलकवडे** यांनी उपस्थितांचे आभार मानले.

पर्यावरण प्रेमी **श्री. सुनील जोशी** यांनी समर्पक सूत्रसंचालन केले. चहापानाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

✻✻✻

## भोसरीतील गेरा एम्पोरियममध्ये 'सहकार दरबार'चे उद्घाटन; मान्यवरांच्या उपस्थितीत सहकार क्षेत्राला नवे व्यासपीठ

**पु**णे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघ मर्यादित, पुणे तसेच गेरा एम्पोरियम गेटवे ए आणि सी कमर्शियल कॉम्प्लेक्स सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने भोसरी येथे '**सहकार दरबार**' उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला.

शुक्रवार, दि. १ मे २०२६ ला सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात सहकार, सोसायटी फॉर्मेशन, डीम्ड कन्व्हेअन्स, रिडेव्हलपमेंट, टँकरमुक्त सोसायटी, युवकांसाठी संधी आणि शासनस्तरावरील प्रश्न यांसारख्या विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती महासंघाचे अध्यक्ष सुहास पटवर्धन, विरोधी पक्षनेते शाम (अण्णा) लांडगे, नगरसेवक जितेंद्र (भाऊ) बनसोडे, नगरसेविका सौ. मनीषा शाम लांडगे आणि सौ. वर्षा संजय जगताप उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आयोजनात पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघाचे उपाध्यक्ष सुभाष कर्णिक, सचिव सौ. मनीषा कोष्टी, कोषाध्यक्ष चारुहास कुलकर्णी यांनी प्रमुख भूमिका बजावली.

महासंघाच्या सचिव मनीषा कोष्टी यांनी महासंघाचे कामकाज, वास्तुदर्शन मासिक, प्रशिक्षण याबाबत माहिती दिली. चारुहास कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात दर महिन्याच्या चौथ्या रविवारी 'सहकार दरबार' आयोजित करून नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडण्याचा निर्धार व्यक्त केला. सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी हे सक्षम व्यासपीठ ठरेल, असे त्यांनी सांगितले.

सुहास पटवर्धन यांनी 'सहकार २०४७' पर्यंतचे धोरण निश्चित करण्यासाठी काम सुरू असून युवकांसाठी स्वतंत्र सहकारी संस्था तयार केले जात असल्याचे सांगितले. टँकरमुक्त सोसायटीसाठी प्रयत्न आणि युवकांना विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी व्यापक प्लॅटफॉर्म उभारला जात असल्याची माहितीही त्यांनी दिली.

यावेळी नगरसेवक शाम (अण्णा) लांडगे आणि जितेंद्र (भाऊ) बनसोडे यांनी सर्व सभासदांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गेरा एम्पोरियमचे समिती सदस्य अभिजित कुलकर्णी, दयानंद नेहरे, महेंद्र सेठी, हनुमंत चौधरी आणि सचिन हिवाळे यांनी विशेष योगदान दिले.

गेरा एम्पोरियम गेटवे ए आणि सी कमर्शियल कॉम्प्लेक्स, नाशिक फाटा फ्लायओव्हरजवळ, भोसरी येथे झालेल्या या कार्यक्रमामुळे परिसरातील सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. '**सहकारातून समृद्धी**' या संकल्पनेला बळ देणारा हा उपक्रम भविष्यात अधिक व्यापक होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

**प्रतिनिधी : उमेश कुलकर्णी,**
पुणे
भ्रमणभाष : ९८२२५४८४२९

***

*With Best Compliments From*

**Structural Auditor**

**Indrakumar Jagtap**

B.E. (Civil), CHARTERED ENGINEER

**Mobile : 9822332510 * Email : indrakumar.jagtap@gmail.com**
**Web : www.structuralauditorpune.com**

**1, Vyankateshwara Society, Inside From Trimurti Hospital,**
**Sinhgad Road, Vadgaon Budruk, Pune 411041.**

ACB ला. प्र. वि.
Anti Corruption Bureau Maharashtra
Our Work is Our Mission

## ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे

**सरकारी नोकर किंवा लोकप्रतिनिधी यांनी लाचेची मागणी केल्यास संपर्क करा –**

**टोल फ्रि क्रमांक – 1064**

**दूरध्वनी क्रमांक : (1) 020 - 26132802**
**(2) 020 - 26122134**

**E-Mail : dyspacbpune@mahapolice.gov.in**
**Mobile App - www.acbmaharashtra.net**

**कार्यालय : 'सी' बरॅक, सेंट्रल बिल्डींग, ससून हॉस्पीटल समोर, पुणे ४११ ००१.**

ACB ला. प्र. वि.
Anti Corruption Bureau Maharashtra
Our Work is Our Mission

## लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे

**कार्यालय : 'सी' बरॅक, सेंट्रल बिल्डींग, ससून हॉस्पीटल समोर, पुणे ४११ ००१.**

**भ्रष्टाचारासंबंधी ऑनलाईन तक्रार येथे नोंदवा.**

**कोणत्याही शासकीय कार्यालयात लाचेची मागणी होत असल्यास संपर्क साधा**

**तर करा फक्त एक फोन 1064 किंवा 403781064**

**दूरध्वनी क्रमांक : (1) 020 - 26132802 | (2) 020 - 26122134**

**E-Mail : dyspacbpune@mahapolice.gov.in**

## पुणे मनपा सहाय्यक आयुक्त कार्यालय तपशील

पुणे मनपा कार्यक्षेत्रात सर्व क्षेत्रीय कार्यालयात **दर महिन्याच्या शेवटच्या गुरुवारी ११ वाजता** नागरिकांच्या तक्रारीसंदर्भात **मोहल्ला कमिटी बैठक** असते. या बैठकीसाठी मनपाचे रस्ते, पाणी, आरोग्य, विद्युत, मलनिस्सारण विभागाचे अधिकारी उपस्थित असतात.

सहकारी गृह संस्थांचे सभासद/पदाधिकारी यांनी आपापल्या भागातील क्षेत्रीय कार्यालयातील बैठकीला उपस्थित राहून तक्रारी नोंदवाव्यात व पाठपुरावा करावा.

| | | |
|---|---|---|
| १) | ढोले पाटील रोड | – ०२० २५५९७३९४ |
| २) | येरवडा – कळस धानोरी | – ०२० २५५०९१०० |
| ३) | नगर रोड, वडगाव शेरी | – ०२० २५५०९००० |
| ४) | शिवाजीनगर – घोले रोड | – ०२० २५५०१५०० |
| ५) | कोथरुड – बावधन | – ०२० २५५०१६०० |
| ६) | औंध – बाणेर | – ०२० २५५०९७१० |
| ७) | धनकवडी – सहकारनगर | – ०२० २५५०८९०४ |
| ८) | वारजे कर्वेनगर | – ०२० २५५५९७७० |
| ९) | सिंहगड रोड | – ०२० २५५०८२०० |
| १०) | कोंढवा–येवलेवाडी | – ०२० २५५०८८०० |
| ११) | हडपसर – मुंढवा | – ०२० २५५९७४०० |
| १२) | वानवडी – रामटेकडी | – ०२० २५५९७४०० |
| १३) | कसबा – विश्रामबागवाडा | – ०२० २५५९७६०० |
| १४) | भवानी पेठ | – ०२० २५५०७२०० |
| १५) | बिबवेवाडी | – ०२० २५५०८७०० |

***

# साध्या कागदावर ॲफीडेवीट (प्रतिज्ञापत्र) करण्याबाबतचा शासन आदेश

महसूल व वन विभाग
१ ला मजला, मंत्रालय मुख्य इमारत
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

क्रमांक : संकीर्ण-२०२६/प्र.क्र. ५४/समन्वय-२ दिनांक :- १४ मे, २०२६

**विषय - आपले सरकार पोर्टलवर दाखल होणाऱ्या सेवांसाठी प्रतिज्ञापत्राऐवजी घोषणापत्र घेणेबाबत.**

महोदय,

आपणास विदीतच आहे की, आपले सरकार पोर्टलवरील सेवांचे सुलभीकरण (Governance Process Re-engineering-GPR) करण्यात येत आहेत. त्यानुसार पहिल्या टप्प्यात काही सेवांचे GPR करुन अर्जामध्ये व आवश्यक कागदपत्रांमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुसार, आता दाखल होणारे अर्ज आधार (Adhar) प्रमाणित पद्धतीने OTP ची पडताळणी करुन अर्जदार अथवा आपले सरकार सेवा केंद्रामार्फत दाखल करुन घेण्यात येत आहे.

सदर अर्जासोबत स्वतंत्रपणे 'शपथपत्र' घेण्याची तरतूद कमी करून स्वयं-घोषणापत्र (Self-Declaration) घेण्याची तरतूद ऑनलाईन अर्जामध्ये केली आहे. त्यामुळे अर्जदारांकडून अन्य पद्धतीने शपथपत्र घेण्याची मागणी करण्यात येवू नये, तसेच शपथपत्र सादर केले नाही म्हणून नामंजूर करु नयेत. याबाबत आपले अधिनस्त सर्व अधिकाऱ्यांना आपले सरकार सेवा केंद्र चालकांना अवगत करण्यात यावे, ही विनंती.

आपला,

X X X

**(कैलास गायकवाड)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी

# बायो टॉयलेट : पर्यावरणपूरक आणि शाश्वत स्वच्छतेचा मार्ग

**प**र्यावरण या शब्दाची व्याप्ती आणि महत्त्व सध्या खूपच वाढले आहे. ते आपल्या परिसरापुरते, शहरापुरते किंवा देशापुरते न राहता सर्व जगभरात त्याचे पडसाद उमटले आहेत. पर्यावरणाचे संतुलन राहावे यासाठी बऱ्याच गोष्टी कारणीभूत आहेत. त्यात कचऱ्याचा विनियोग, स्वच्छ नद्या आणि अन्य स्वच्छता असे बरेच घटक आहेत.

अशाच एका वेगळ्या घटकाबद्दल आपण आज जाणून घेणार आहोत. जो विषय चर्चेमध्ये सुद्धा येत नाही, अशा विषयावर एक प्रकल्प उभा राहिला आहे, तो म्हणजे बायो टॉयलेट.

बायो टॉयलेट हा प्रकल्प पूर्वी आपल्या रेल्वेमधे राबवला होता, पण त्याची अवस्था तितकीशी चांगली नव्हती असे त्याच गाडीतून प्रवास करून आलेल्या विद्यार्थ्यांकडून कळल्यावर, त्याच विद्यार्थ्यांना हाताशी धरुन MIT महाविद्यालयाच्या प्रा. प्रकाश जोशी (Founder Trustee) आणि प्रा. आरती शास्त्री यांच्या नेतृत्त्वाखाली हा धाडसी प्रकल्प हाती घेतला.

अशा प्रकल्पावर काम करणे हे मुळीच सोपे नव्हते. कल्चर आणण्यापासून त्याचे विघटन करणे हे काम खूपच आव्हानात्मक होते. अगदी असं काम करणाऱ्यांबद्दलचा समाजाचा दृष्टिकोन, ते त्यात काम करणे असे सगळेच अडथळे त्यांना पार करावे लागले. ह्या बायो टॉयलेटचे वैशिष्ट्य म्हणजे कुठल्याही दुरुस्तीची गरज नसणारा (maintenance free) आणि सर्व सामान्यांना वापरायला सोपा. त्यांचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे एक मजबूत प्रणाली जी स्वयं शाश्वत आहे आणि जी कोणत्याही तज्ञ नसलेल्या व्यक्तीद्वारे हाताळली जाऊ शकते.

**बायो टॉयलेटचे काम :**

खालील आकृती बायो टॉयलेट आणि फ्लो चार्ट दर्शवते.




Entry of Bio-digradable matter with flush water

↓

Inlet mechanism

| | |
|---|---|
| Seperation of water through pipe | Entry of Biomass in chamber 2 |

↓

In chamber 2

| | |
|---|---|
| Process of Biodegradation of matter | Movement of matter in to 3 rd chamber |

↓

In 3rd chamber

| | |
|---|---|
| Further settlement Biodegradation of matter | Movement of matter throgh Rectangular Duct from chamber 3rd to chamber 1. |

↓

Insertion of chlorine tablet for effluent treatment of Matter in Chamber 1

↓

Water Outlet from Chamber 1




**नवीन उपक्रम :**

* इनलेट यंत्रणेची मुख्य आवश्यकता म्हणजे चेंबर क्रमांक २ मध्ये मलमूत्र प्रवेश करण्यापूर्वी ४०–५०% पाणी काढून टाकणे. हे इनलेट यंत्रणेमध्ये

पाणी काढून टाकण्याची व्यवस्था समाविष्ट करून केले जाते.

- ❊ जास्तीचे पाणी चेंबर क्रमांक १ मध्ये पोहोचवले जाईल
- ❊ चेंबर क्रमांक १ मध्ये प्रवेश करणाऱ्या अतिरिक्त पाण्यासोबत काही मलमूत्र वाहते. आम्ही चेंबर क्रमांक १ मध्ये फिल्टर मीडिया प्रदान करत आहोत जेणेकरून, या फिल्टरवर जास्तीचे पाणी साचले जाईल. जास्तीचे पाणी खाली सरकेल ज्याला सुमारे १-२ तास लागतील. या कालावधीत फिल्टरवरील मलमूत्र बॅक्टेरियाशी प्रतिक्रिया देईल. आउटलेटमध्ये फक्त पाणी असेल. क्लोरीनच्या गोळ्या चेंबर क्रमांक १ किंवा ३ मध्ये टाकल्या जातील.
- ❊ पाण्याचे पूर्णपणे क्लोरीनीकरण करण्यासाठी चेंबर १ मध्ये बॅफल्स ठेवले जातात.

**जास्त पाणी काढून टाकण्याची यंत्रणा :**




**निष्कर्ष :**

- ❊ चेंबर २ आणि चेंबर ३ मधील द्रावणाची सांद्रता जास्त पाणी काढून टाकल्याने सुधारते.
- ❊ विकसित केलेली इनलेट यंत्रणा ४०% जास्त पाणी काढुन टाकण्यास सक्षम आहे.
- ❊ चेंबर १ मधून बाहेर पडणारे पाणी क्लोरीनयुक्त असते जे जैव-घातक नसते.

आज भारतातील सांडपाणी व्यवस्थापनेबद्दल जर आपण बघितले तर एकूण पाण्याच्या वापरातील २०% पाणी हे फक्त प्रकिया केले जाते, बाकी ८०% दूषित पाणी हे तसेच नद्यांमधे जाते. ह्या प्रकल्पात विघटन होऊन जे पाणी बाहेर पडेल ते पूर्ण वापरण्यायोग्य असेल. हा एक मोठा लाभ आपल्याला होणार आहे.

ह्या बायो टॉयलेटचे सादरीकरण आरती ताईनी कॅनडा, कुवेत अशा देशांमध्ये केले.

परंतु हे micro organisms liquid स्वरुपात असल्याने बाहेर पाठवण्यासाठी बोटीनी किंवा विमानाने परवानगी नसल्यामुळे त्यांनी त्याच्यावर संशोधन केले आणि ते कल्चर आता त्यांनी एका छोट्या बडिशेपच्या पुडीत मावेल असे छोट्या स्वरुपात केले आहे. ते त्यांचे Trade Secret आहे.

बायो टॉयलेट प्रकल्पासाठी आरतीताईंना २०२५ मध्ये त्याचे Patent मिळालेले आहे. तसेच आंतरराष्ट्रीय Sustainability साठी जी 19 goals आहेत त्यातील 12 goals बायो टॉयलेट पूर्ण करतो.

बायो टॉयलेट चा उपयोग कुठल्याही कमर्शियल वापरासाठी न होता सामाजिक स्वच्छतेसाठी व्हावा हीच त्यांची इच्छा आहे. **प्रकाश जोशी सर** आणि **आरतीताई** त्यांचा हा शोध आणि उपक्रम खूपच स्तुत्य आहे. त्याची दखल घेतली जावी आणि त्याचा जास्तीत जास्त उपयोग पर्यावरण स्वच्छ ठेवण्यासाठी व्हावा अशी आपण इच्छा करूया. त्या दोघांचे मनापासून आभार.

या प्रकल्पासाठी सर्वांचा पाठिंबा खूप आवश्यक आहे तरच त्याचा वापर वाढेल आणि पर्यावरण रक्षणास अधिक मदत होईल असे आरतीताईचे मत आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क करावा :**

**प्रा. आरती शास्त्री**

**ईमेल : shastri.aartigmail.com**

**दूरध्वनी: +९१ ९४०३१०८५२८**

**- आदिश्री संतोष कुलकर्णी**

*लक्ष्मी हरी स्मृती ग्रंथालय न्यासाच्या प्रबोधन वासंतिक अंक २०२६ मधून साभार.*

***

# : महासंघाचे सहकार दरबार :

| अ.क्र. | सहकार दरबारचे नाव | वार | वेळ |
|---|---|---|---|
| १. | **धनकवडी –** रक्षालेखा सोसा., सर्व्हे क्र. ३०, विक्रमनगर, धनकवडी-४३. | पहिला रविवार<br>**श्री. शिवाजी उराडे** | (स. ११ ते १)<br>९४२३०१५९९६ |
| २. | **पिंपळे सौदागर –** गणेश रेसिडेन्सी, लोटस हॉस्पिटल जवळ, पिंपळे सौदागर, पुणे-२७. | पहिला रविवार<br>**श्री. चारुहास कुलकर्णी** | (स. ११ ते १)<br>९५५२५४६६०७ |
| ३. | **चिंचवड –** गोखले वृंदावन सोसा., चाफेकर चौक, चिंचवड, पुणे-३३. | दुसरा गुरुवार<br>**श्री. सुभाष कर्णिक** | (स. ११ ते १)<br>९७६६६०६१४६ |
| ४. | **मुख्य कार्यालय –** ३१३, नारायण पेठ, प्रभात प्रेस समोर, पुणे-३०. | तिसरा शनिवार<br>**ॲड. प्रकाश तोंडारे** | (स. ११ ते १)<br>०२०-२४४५४०१० |
| ५. | **स्वप्नशिल्प –** स्वप्नशिल्प सोसा., वारजे क्षेत्रीय कार्यालयाजवळ, कोथरुड, पुणे-३८. | चौथा शनिवार<br>**श्री. सुभाष ढवळे** | (स. ११ ते १)<br>९४२१०५८२५५ |
| ६. | **तळेगाव दाभाडे –** समाज मंदिर (संस्था कार्यालय), समाज सेवक सह. गृह. संस्था म. (रेव्हेन्यू कॉलनी), चाकण रोड, फिश मार्केटच्या मागे, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे-४१०५०७. | चौथा रविवार<br>**ॲड. ज्योत्स्ना जोशी** | (स. ११ ते १)<br>९२६०२०१६५० |
| ७. | **सहकारनगर –** श्रीगजलक्ष्मी सह. गृह संस्था, सर्व्हे क्र. ८२/२अ, सहकारनगर-१, गांधी ट्रेनिंग कॉलेजसमोर, पुणे-०९. | दुसरा शनिवार<br>**श्री. श्रीराम कुंचुर** | (स. ११ ते १)<br>९४२२०१२१५६ |
| ८. | **औंध –** सुरोभी पार्क, ई-६०३, डीएसके आकाशगंगा शेजारी, नागरस रोड | दुसरा रविवार<br>**सौ. प्रीती शिरोडे** | (सायं. ४ ते ६)<br>९२८४५८८६३४ |
| ९. | **कोंढवा – कुमार सबलाईम सोसायटी –** पारगे नगर, कोंढवा खुर्द, पुणे ४११०४८. | चौथा रविवार<br>**श्री. अव्हेलिनो नरोना** | (स. ११ ते १)<br>९९७०४७३१८९ |
| १०. | **सिंहगड रोड –** ट्युलिप सोसायटी, नवशा मारुती जवळ, पुणे - ४११०५१. | पहिला रविवार<br>**श्री. विलास थोरात** | (स. ११ ते १)<br>९८९००५४३५१ |
| ११. | **हिंजवडी –** यशवन सोसायटी, हिंजवडी,VJ एव्हेन्यू जवळ, माण रस्ता | पहिला शनिवार<br>**श्री. चारूहास कुलकर्णी** | (स. ११ ते १)<br>९५५२५४६६०७ |
| १२. | **गेरा एम्पोरियम गेटवे ए आणि सी कमर्शियल कॉम्प्लेक्स–** नाशिक फाटा, मेट्रो स्टेशन, कासारवाडी | चौथा शनिवार<br>**श्री. अभिजीत कुलकर्णी**<br>(सहकार मित्र) | (स. ११ ते १)<br>८८८८७२३४५ |

## ❋ महत्त्वाचे निवेदन ❋

**सहकारी गृहनिर्माण संस्थेचे कामकाज सुरळीत, पारदर्शक करण्यासाठी महासंघातर्फे १ दिवसीय, ३ दिवसीय तसेच सोसायटीमध्ये जाऊन समिती, व्यवस्थापक व सभासदांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते.**

**संस्थेने उपविधी क्रमांक ६७(अ) चौदा नुसार १० रु. महिना प्रमाणे प्रत्येक सभासदाकडून घेतलेला शिक्षण निधी या प्रशिक्षणासाठी खर्च करायचा आहे.**

**प्रशिक्षणाच्या अधिक माहितीसाठी महासंघ कार्यालयाशी संपर्क साधावा.**

**०२०-२४४५४०१० / ९११२१९१६११ / ९६८९८९८३६०**

# संस्थेच्या हिशोबपत्रकांबाबत माहिती

**विंडो ड्रेसिंग :-**

ताळेबंद आणि नफा आणि तोटा खाते त्यांच्या आर्थिक स्थितीचे खरे आणि निष्पक्ष चित्र प्रतिबिंबित करते. संस्थेने या बाबतीत विडो ड्रेसिंग करून सत्य परिस्थिती लपवून आर्थिक पत्रके तयार करू नयेत.

वैधानिक लेखापरीक्षक यांनी अशा प्रकारचे विंडो ड्रेसिंग झाले नसल्याची खात्री करावी. तसेच असे विंडो ड्रेसिंग निदर्शनास आल्यास, त्याची गांभीर्याने नोंद घेऊन त्या बाबतीत लेखापरीक्षण अहवालामध्ये 'अ' भागामध्ये गंभीर दोष म्हणून स्वतंत्र निष्कर्ष नोंदवावेत.

सदर बाब म.स.सं. अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या तरतुदींनुसार योग्य त्या कारवाईस पात्र राहील याची कृपया संबधित संस्था व वैधानिक लेखापरीक्षक यांनी नोंद घ्यावी.

**अकाउंटिंग स्टैंडर्डस :-**

प्रत्येक संस्थेने ताळेबंद इत्यादींसह वार्षिक विवरणपत्रे तयार करताना प्रचलित व लागू असणाऱ्या सर्व अकाउंटिंग स्टैंडर्डसबचे संस्थेने पालन करणे आवश्यक असून, अशा सर्व अकाउंटिंग स्टैंडर्डसब चे संस्थेने पालन केले असल्याची वैधानिक लेखापरीक्षक यांनी खात्री करणे अनिवार्य आहे. अशा प्रकारचे प्रचलित व लागू असणाऱ्या सर्व अकाउंटिंग स्टैंडर्डसब चे संस्थेने पालन झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गांभीर्याने नोंद घेऊन त्या बाबतीत लेखापरीक्षण अहवालामध्ये स्वतंत्र निष्कर्ष नमूद करावेत.

सदर बाबत उल्लंघन झाल्यास म.स.सं. अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या तरतुदीनुसार संस्था व वैधानिक लेखापरीक्षक योग्य त्या कारवाईस पात्र राहतील याची कृपया संबधित संस्था व वैधानिक लेखापरीक्षक यांनी नोंद घ्यावी.

भारतीय हिशोब मानांकन निकष (अकाउंटिंग स्टैंडर्ड) मुळे संस्थेच्या अकाउंटिंग पॉलिसी किंवा हिशोब धोरणातील बदलामुळे कोणते परिणाम झाले आहेत हे जाहीर करावे लागणार आहे. यामुळे संस्थेची वास्तव व खरी आर्थिक स्थिती समजण्यास मदत होईल.

संस्थेला कॅश फ्लो स्टेटमेंट देखील प्रसिद्ध करावे लागल्याने संस्थेची तरलता परिस्थिती समजण्यास मदत होईल. गतवर्षी अथवा पुढील वर्षी होणाऱ्या उत्पन्नाचा खर्चाचा परिणाम चालू आर्थिक वर्षाच्या नफा तोट्यावर झाला असल्यास त्याची देखील माहिती यामध्ये द्यावी लागणार आहे. यामुळे वास्तव नफा समजून येईल.

घसारा पद्धतीमध्ये बदल केला असल्यास ते देखील नमूद करावे लागेल. अनुत्पादक जिंदगीच्या बाबतीत उत्पन्न मान्य संकल्पनेच्या संदर्भात देखील (इन्कम रेकग्नेशन) माहिती द्यावी लागणार असल्याने खरे उत्पन्न समजेल.

एखादी संस्था विलिनीकरण करून घेतली असल्यास त्या संदर्भातील माहिती द्यावी लागेल.

संस्थेच्या एकूणच गुंतवणुकीबाबत नेमके हिशोब कसे केले आहेत त्या संदर्भातली हिशोबाची माहिती द्यावी लागणार आहे.

यामधील केवळ काही महत्वाची माहिती उदाहरणादाखल वर दिली असून संस्थेला आता भारतीय हिशोब मानांकन निकष (अकाउंटिंग स्टैंडर्ड) नुसार सर्व हिशोब पद्धती ठेवावी लागणार असल्याने, प्रत्येक संस्थेने अकाउंटिंग पॉलिसीच्या संदर्भात धोरण देखील ठरवणे अधिक उचित होईल. यामुळे सर्वच संस्थांच्या हिशोब पद्धतीमध्ये एकवाक्यता व समानता येणार आहे.

*बाळकृष्ण जाधव यांच्या ऑडीट मार्गदर्शक*
*या पुस्तकातून साभार*

***

# सहयोगी सदस्यत्व (असोसिएट मेंबरशीप)

**स**ह. गृह संस्थांसाठी २०१९ मध्ये आलेल्या नवीन स्वतंत्र नियमावलीमध्ये सभासदत्वाचे प्रकार व त्यांची व्याख्या दिली आहे.

संस्था स्थापनेच्यावेळी नोंदणी अर्जावर स्वाक्षरी करणारी किंवा नोंदणी झाल्यानंतर तिच्या सदस्य कुलात यथोचितरित्या नाव दाखल करून घेण्यात आलेली व्यक्ती संस्थेची सभासद असते; परंतु जर त्या सभासदाला संस्थेच्या कामकाजात भाग घेणे शक्य नसेल, तर असा सभासद त्याच्या काही विशिष्ट नात्यातील (पती, पत्नी, आई, वडील, भाऊ, बहिण, मुलगा, मुलगी, जावई, सून, पुतण्या, पुतणी यापैकी एक.) एका व्यक्तीला आपला संहयोगी सदस्य नेमू शकतो. हा सहयोगी सदस्य संस्थेच्या सभांना उपस्थित राहून मत मांडू शकतो. ठरावासाठी मतदान करू शकतो. तसेच निवडणूकीत मतदान करून उभा देखील राहू शकतो.

अशा सहयोगी सदस्यत्वासाठी मूळ सभासदाने विशिष्ट नमुन्यात अर्ज संस्थेकडे सादर करावा व त्या सोबत १०० रु. प्रवेश फी द्यावी. संस्थेच्या समितीच्या सभेत ठराव झाल्यानंतर मूळ सभासदाला संस्था सहयोगी सदस्यत्व मान्यतेचे पत्र देईल. त्यानंतर मूळ सभासदाऐवजी सहयोगी सदस्य संस्थेच्या कामकाजात भाग घेईल. तसेच संस्थेच्या निवडणूकीसाठी पुन्हा एकदा विशिष्ट नमुन्यात (10A) संमती पत्र भरून दिल्यावर असा सहयोगी सदस्य निवडणूकीत मतदान करू शकतो व निवडणूकीसाठी उभा सुद्धा राहू शकतो.

***

---

## The Form of application for Associate Membership by an Individual, who desires to be admitted to membership of the Society

**[See Rule 111(2)(iii)(a)]**

To,

**The Secretary,**

________________________________________ Co-operative Housing Society Ltd.

________________________________________

________________________________________

Sir, Shri/ Shrimati............................................................................................ is already a member of the ……………………………………… Co-operative Housing Society Ltd., having address at ………….........................................……….............................………… holding Five / Ten fully paid shares of Rs. Fifty each.

He/ She desires to admit me as an Associate member on his/her behalf to participate in the affairs and vote in the meetings of the society. I am related to member as husband / wife / father / mother / sister / brother / son / daughter / son-in-law / daughter-in-law / nephew/ niece.

Accordingly, I make this application for admitting me as an Associate member to Shri / Shrimati…………………….. …………………………………………… and also remit herewith the entrance fee of Rs. 100/-.

On my admission as an Associate member by the society, I/We shall participate in the activities and vote in the meeting of the society on behalf of the member by carrying the authority letter to participate and vote in the meeting or contest in the election to committee of the society.

The name of Shri/Shrimati ……………………………………………. stands first in the share certificate and I am aware that my name (as an Associate member) will not be incorporated in the share certificate and I shall have no rights or privilege of a member except to participate in the activities and to vote in the meeting and to contest in the election to committee of the society.

I request you to admit me as an Associate member and include my name as an Associate Member in the society records on behalf of member. The consent of the member Shri ………………………………………… for my admission as an Associate member is given below.

Yours faithfully,

Place : ………………

Date : ……………….. **(Signature of the applicant)**

---

**CONSENT OF THE MEMEBR**

I, Shri/ Shrimati ……………………………………………………………. a member of the ……………………………………………………………………. Co-operative Housing Society Ltd., having address at ……...............................................……..……………………..……… and holding five / ten paid up shares of Rupees Fifty each recommend the application made by Shri/ Shrimati ……………………………… for Associate membership of the Society on my behalf. He / She is related to me as husband / wife / father / mother / brother / sister / son / daughter / son-in-law / daughter-in-law / nephew/ niece. I am aware that once admitted as an Associate Member of the society, he/ she shall have no rights or privilege of a member except to participate in the activities of the society on my behalf and to vote in the meetings and to contest in the election to the managing committee of the society.

Yours Faithfully,

Place :

Date : **Signature**

**Name of the Member ……………………………………**

## मे २०२६ मध्ये एकूण २५ संस्थांनी महासंघाचे सभासदत्व घेतले. महासंघ त्यांचे स्वागत करीत आहे.

१) **देशपांडे गार्डन डी–१, डी–२ सह. गृह. संस्था, मर्या.,** वडगाव बु., पुणे ४११०४१.

२) **श्री सिद्धेश्वर सह. गृह. संस्था, मर्या.,** सहकारनगर, पुणे ४११००९.

३) **पृथ्वी प्रेसिडियो सह. गृह. संस्था, मर्या.,** हडपसर, पुणे ४११०२८.

४) **त्रिशा रेसिडेन्सी सह. गृह. संस्था, मर्या.,** तळेगाव दाभाडे, पुणे ४१०५०७.

५) **शामियाना कॉम्प्लेक्स सह. गृह. संस्था, मर्या.,** सोमवारपेठ, पुणे ४११००१.

६) **भूषण बी सह. गृह. संस्था, मर्या.,** कोथरुड, पुणे ४११०३८.

७) **माधव पार्क सह. गृह. संस्था, मर्या.,** दिघी, पुणे ४११०१५.

८) **कृष्ण केवल नं. ७ सह. गृह. संस्था, मर्या.,** कोंढवा खु., पुणे ४११०४८.

९) **कमल ग्रीन लीफ डी २ विंग सह. गृह. संस्था मर्या.,** किरकटवाडी, पुणे ४११०२४.

१०) **अ‍ॅपास्ट्रोफी हिंजवडी टॉवर बी सह. गृह. संस्था मर्या.,** माण, पुणे ४११०५७.

११) **राधानगरी एफ–१ सह. गृह. संस्था, मर्या.,** भोसरी, पुणे ४११०३९.

१२) **रोहिणी बी विंग सह. गृह. संस्था, मर्या.,** बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

१३) **देवदूत सह. गृह. संस्था, मर्या.,** बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

१४) **प्रायमल होम्स ए बिल्डिंग सह. गृह. संस्था, मर्या.,** मोशी, पुणे ४१२१०५.

१५) **दि रिट्रिट सह. गृह. संस्था, मर्या.,** गुलटेकडी, पुणे ४११०३७.

१६) **ए. आर. व्ही. युथविले ए–३ बिल्डिंग सह. गृह. संस्था, मर्या.,** मौजे खराडी, पुणे ४११०१४.

१७) **ए. आर. व्ही. युथविले ए–२ बिल्डिंग सह. गृह. संस्था, मर्या.,** मौजे खराडी, पुणे ४११०१४.

१८) **ए. आर. व्ही. युथविले ए–१ बिल्डिंग सह. गृह. संस्था, मर्या.,** मौजे खराडी, पुणे ४११०१४..

१९) **तोरण सह. गृह. संस्था, मर्या.,** औध, पुणे ४११००७.

२०) **अक्षय सहनिवास सह. गृह. संस्था, मर्या.,** कर्वेनगर, पुणे ४११०५२.

२१) **मेगा पॉलिस सेरेनिटी सह. गृह. संस्था, मर्या.,** मुळशी, पुणे ४११०५७.

२२) **इटर्निया जे–१ सह. गृह. संस्था, मर्या.,** हडपसर, पुणे ४११०२८.

२३) **सोनीगरा हाईट्स युनिट अे विंग – अे,बी,सी सह. गृह. संस्था, मर्या.,** निगडी, पुणे ४११०६२.

२४) **मोरया रेसिडेन्सी I, II, III सह. गृह. संस्था, असोसिएशन मर्या.,** पाषाण, पुणे ४११०२१.

२५) **हर्मेस सह. गृह. संस्था, मर्या.,** उरळीकांचन, पुणे ४१२२०२

***

# नियमित पान

**दि**. ५ जून २०२६ ला जागतिक पर्यावरण दिन साजरा केला गेला. पर्यावरण हा शब्द आपल्या सर्वांच्या कानावर सातत्याने पडतो आहे. आपल्याला तो चांगला परिचित झाला आहे; परंतु आता या शब्दाने परिचिताचे रूपांतर संभाव्य धोक्यात केले आहे.

देशाची राजधानी असलेल्या दिल्लीच्या हवेबद्दल तुम्ही वाचले असेल. हवा अतिशय दूषित झाली असून त्यावर उपाययोजना सुरू झाल्या आहेत.

**आपल्या समोरील संभाव्य धोक्यावर आपण एकेकटे किंवा छोट्या छोट्या गटाच्या उपाययोजना अपुऱ्या पडतील. त्यासाठी आपण सर्वांनीच एकत्रित प्रयत्न करावे लागतील. अर्थातच आपला प्रत्येकाचा छोटासा का असेना त्यात सहभाग असणे अत्यंत आवश्यक आहे.**

**पर्यावरणाबाबत या अंकात एक माहितीपूर्ण लेख समाविष्ट केला आहे. व्यक्तिशः काय करता येते याबाबत त्या लेखात उल्लेख केला आहे. त्यात अतिशय सविस्तरपणे आपले योगदान काय असावे हे स्पष्ट केले आहे.**

हवेनंतर आपली दुसरी गरज पाण्याची. आपण सेवन करत असलेले पाणी दूषित असण्याची शक्यता जास्त आहे.

आपणास मिळणारे धान्य, भाजीपाला, फळे इत्यादी सर्वावर दूषित पाणी, हवा आणि कीटकनाशक औषधांची फवारणी यामुळे परिणाम होतो आहे.

आपला सध्याचा अनुभव आपल्या शहराच्या तपमानाबद्दल आहे. तापमान वाढल्यामुळे आपल्या प्रत्येकाला त्याचा त्रास जाणवत आहे.

याबाबत सर्वांचा प्रश्न एकच असतो, आम्ही काय करावे?

मला आता जगन्नाथाच्या रथाची आठवण होते. एकटा भक्त तो रथ ओढू शकत नाही. जेव्हा शेकडो भक्त तो रथ ओढायला लागतात, आपला हात लावतात तेव्हा तो रथ पुढे हलायला सुरुवात होते.

आपल्या समोरील संभाव्य धोक्यावर आपण एकेकटे किंवा छोट्या छोट्या गटाच्या उपाययोजना अपुऱ्या पडतील. त्यासाठी आपण सर्वांनीच एकत्रित प्रयत्न करावे लागतील. अर्थातच आपला प्रत्येकाचा छोटासा का असेना त्यात सहभाग असणे अत्यंत आवश्यक आहे.

पर्यावरणाबाबत या अंकात एक माहितीपूर्ण लेख समाविष्ट केला आहे. व्यक्तिशः काय करता येते याबाबत त्या लेखात उल्लेख केला आहे. त्यात अतिशय सविस्तरपणे आपले योगदान काय असावे हे स्पष्ट केले आहे.

या क्षणी मला माजी पंतप्रधान कैलासवासी लाल बहादूर शास्त्री यांच्या उदाहरणाची नोंद घेणे आवश्यक वाटते.

ही घटना १९६५ मधील आहे. भारत-पाकिस्तान युद्ध नुकतेच संपले होते. अर्थातच पंतप्रधानांवर त्यावेळेस मोठी जबाबदारी असणार. लष्कराच्या हालचाली, पाकिस्तान बरोबरच्या वाटाघाटी अशा सर्व गोष्टींचा विचार सातत्याने करावा लागत असणार. असे असतानाही एकदा ते कार्यालयातून उशिरा बाहेर पडत होते. त्यावेळेस बाहेर पडताना त्यांना कार्यालयातील काही खोल्यात दिवे चालू असलेले दिसले. आत कोणीही कर्मचारी नव्हते. त्यांनी स्वतः त्या खोलीत जाऊन विजेची बटणे बंद केलीत.

पंतप्रधानपदाची मोठी जबाबदारी असतांनाही त्यांना पर्यावरणाची काळजी घ्यावीशी वाटली.

व्यक्तीचे योगदान कसे असू शकते याचे हे उत्तम उदाहरण.

सर्वांना विनंती की आपण व्यक्तीशः पर्यावरण चांगले ठेवण्यासाठी काय करू शकतो याचा विचार करावा आणि तो अंमलात आणावा.

धन्यवाद.

**– सुभाष चं. कर्णिक**
उपाध्यक्ष

***



मा. जिल्हा उपनिबंधक कैलास जेबले यांनी नुकताच पदभार स्वीकारला त्यानिमित्त मा. पटवर्धन साहेब यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. सोबत फेडरेशनचे संचालक श्री. अजित चौगुले, वसुली अधिकारी श्री. विठ्ठल खेडेकर, ॲडव्होकेट नीता साळूंखे. दि. ६ मे २०२६



नवनियुक्त उपनिबंधक २ श्री. काळे तसेच कार्यालयातील लिपीक भोसले मॅडम यांची महासंघ कार्यालयाला भेट – दि. ५ मे २०२६



राहुल पार्क ए१, ए२, ए३ सह. गृह संस्था वारजे यांच्या विशेष सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित महासंघाच्या सचिव मनीषा कोष्टी, संचालक श्री. ॲव्हेलिनो नरोना व संस्थेचे सभासद – दि. १० मे २०२६.



सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयात आगामी विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (SIR) संदर्भात बैठकीसाठी उपस्थित महासंघाचे अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन, उपाध्यक्ष श्री. सुभाष कर्णिक, संचालक ॲड. मृद्‌गंधा जोशी, श्री. समीर रुपदे व अन्य अधिकारी आणि संस्था प्रतिनिधी

.



गेरा एम्पोरियम नाशिक फाटा चे अध्यक्ष श्री. अभिजित कुलकर्णी यांच्या हस्ते महासंघाचे अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन यांचा सन्मान दि. १ मे २०२६

## -* महत्त्वाची सूचना *-

महासंघाचे कार्यालयात पदाधिकारी, संचालक आणि वसुली अधिकारी यांना पूर्वनियोजित वेळेनुसार भेटता येईल.

वेळ : ११ ते ५

**संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे भ्रमणभाष क्रमांक तसेच ई–मेल आय.डी. कृपया महासंघाला कळवावेत.**

''वास्तु-दर्शन'' च्या अंकांमध्ये प्रकाशित झालेल्या लेखांतील मतांशी आणि जाहिरातींशी पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ सहमत असेलच असे नाही.

मा. अध्यक्ष / सचिव